**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या विद्यापीठास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबींकरीता अनुदान वितरीत करणेबाबत..(कार्यक्रम)...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : कोकृवि-११२५/प्र.क्र.१०१/ई-११४२२२६/७-अे,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५.०२.२०२६.

**वाचा :-** १. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५.
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-१५१९/प्र.क्र.६५/६-अे,दि.२६.०६.२०२३
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय समक्रमांक दि.२२.०७.२०२५ व दि.३१.१०.२०२५
४.नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे पत्र क्र.बासाकोकृवि/लेखा-२/११२८/२०२५, दि.०९.१२.२०२५.

**प्रस्तावना:-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ०१ च्या परिपत्रकान्वये सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२५ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमातंर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी उपरोक्त संदर्भ क्र.०४च्या पत्रान्वये दापोली कृषि विद्यापीठास मागणी क्र. डी-३, २४१५-कृषि विषयक संशोधन व शिक्षण या मुख्य लेखाशिर्षाखालील ०१, पीकसंवर्धन (कार्यक्रम) २४१५ ००८१, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) व संशोधन निधी करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून निधी वितरणाचा प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुषंगाने, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना मुख्य लेखाशिर्ष २४१५-कृषि विषयक संशोधन व शिक्षण, ०१ पीकसंवर्धन (२४१५ ००८१), या लेखाशिर्षांतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) व संशोधनाकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना मुख्य लेखाशिर्ष २४१५-कृषि विषयक संशोधन व शिक्षण, ०१ पीकसंवर्धन (२४१५ ००८१), या लेखाशिर्षांतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) करीता रु.१४७.८० लाख व संशोधन निधी करीता रु.४५.०० लाख असे एकूण रु.१९२.८० लाख (अक्षरी रु.एक कोटी, ब्याण्णव लाख, ऐंशी हजार फक्त) इतके अनुदान पुढीलप्रमाणे वितरीत करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अ) <u>३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)</u>

(रुपये लाखात)

| अ. क्र. | लेखाशीर्ष/उपलेखाशिर्ष | कामांचा तपशिल | सन २०२५-२६ करीता अर्थसंकल्पित तरतूद | सन २०२५-२६ यापुर्वी वितरीत तरतूद | या शासन निर्णयान्वये वितरीत करावयाचे अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| ०१ | ०१ पीक संवर्धन, १२०, इतर संस्थांना सहाय्य, (००)(०७), डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ००८१) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, रोहा, जि.रायगड. | १९२८.०० | १००६.८३ | १०.०० |
| ०२ | | मत्स्य अभियांत्रिकी विषयातील पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, जि.रत्नागिरी. | | | १०.०० |
| ०३ | | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे | | | १०.०० |
| ०४ | | सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राच्या पनवेल येथील प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करणे. | | | ०.८० |
| ०५ | | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत दिवेआगार ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे सुपारी संशोधन (विस्तारीत) केंद्र स्थापन करणे. | | | १०.०० |
| ०६ | | डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली अंतर्गत महाविद्यालयांना व्हर्च्युअल क्लासरुम, डिजीटल क्लासरुम व स्मार्ट क्लासरुम स्थापन करणे तसेच, व्हीडीओ कॉन्फरन्स प्रणाली बसविण्याकरीता लागणारे साहित्य खरेदी करणे. | | | ३२.०० |
| ०७ | | डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली अंतर्गत महाविद्यालयातील वसतिगृहांसाठी Organic Waste Convertor मशीन खरेदी करणे. | | | ७५.०० |
| **एकूण (अ)** | | | **१९२८.००** | **१००६.८३** | **१४७.८०** |

ब) <u>संशोधन निधी</u>

(रुपये लाखात)

| अ. क्र. | लेखाशीर्ष/उपलेखाशिर्ष | प्रकल्पाचे नाव | सन २०२५-२६ करीता अर्थसंकल्पित तरतूद | सन २०२५-२६ यापुर्वी वितरीत तरतूद | या शासन निर्णयान्वये वितरीत करावयाचे अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | ०१ पीक संवर्धन, १२०, इतर संस्थांना सहाय्य, (००)(०७), डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ००८१) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) | भात जातींची जलद पैदास व वाणांच्या चाचण्यांबाबत संशोधन. | १९२८.०० | १४९.९७ | १०.०० |
| ०२ | | फळे, भाज्या, फुले, मसाले पिके इत्यादींचे वनस्पतीजन्य (फायटो केमिकल्स रासायनिक पृथ:करणाद्वारे) संशोधन करणे. | | | ५.०० |
| ०३ | | वन बिज संशोधन चाचणी व प्रमाणीकरण. | | | ५.०० |
| ०४ | | हवामान बदलास अनुसरून कृत्रिम बुध्दिमत्ता आणि प्रगत ताण यावर संशोधन. | | | ५.०० |
| ०५ | | ऊस पिकावर संशोधन केंद्र. | | | ५.०० |
| ०६ | | प्रगत जैवतंत्रज्ञान संशोधन | | | ५.०० |
| ०७ | | विद्यापीठाच्या १९ संशोधन केंद्रावर अत्यावश्यक संशोधन सुविधांचा विकास करणे. | | | ५.०० |
| ०८ | | बीज तंत्रज्ञान केंद्रांतर्गत संशोधन सुविधांचे आधुनिकीकरण. | | | ५.०० |
| **एकूण (ब)** | | | **१९२८.००** | **१४९.९७** | **४५.००** |
| **एकूण (अ+ब)** | | | | **११५६.८०** | **१९२.८०** |

२.	सदर शासन निर्णयातील अनुदान हे खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे.

१) वित्त विभागाच्या दि.०७.०४.२०२५ च्या परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.
२) कृषि विद्यापीठांनी उपलेखाशिर्ष / गट / योजना आणि बाबनिहाय वितरीत केलेला निधी संबंधीत योजनेतील जी पदे / बाबी, योजनेतर योजना म्हणून पुढे चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे, त्या पदांचे वेतन व भत्ते आणि अनुज्ञेय बाबींसाठीच फक्त खर्च करावा.
३) उपलेखाशिर्षनिहाय, गटनिहाय, योजनानिहाय व बाबनिहाय वितरीत केलेला निधी कोणत्याही कारणास्तव अखर्चित / शिल्लक राहीला / राहणार असेल तर सदर अखर्चित / शिल्लक निधी शासनाचे मान्यतेशिवाय इतर गटांसाठी / योजनांसाठी / बाबींसाठी परस्पर वर्ग करु नये किंवा खर्च करु नये.
४) प्रत्येक उपलेखाशीर्ष / गट /योजना आणि बाब निहाय स्वतंत्र लेखे / हिशोब ठेवावेत.
५) कृषि विद्यापीठांना मंजूर केलेले सहाय्यक अनुदान, अनुदान सुत्राप्रमाणे बरोबर आहे किंवा कसे, तसेच, विहीत आदेश / कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येत आहे किंवा कसे, याबाबत प्रत्येक आर्थिक वर्षाचा मुल्यमापन अहवाल शासनास संबंधित आर्थिक वर्ष समाप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावा. तसेच, मागील आर्थिक वर्षाचा अखर्चित निधी किती आहे, हे तात्काळ शासनास कळवावे.
६) विद्यापीठांना मंजूर करण्यात आलेले अनुदान महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९०, आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील तरतूदीप्रमाणे आणि <u>प्रचलित शासन आदेश व विहित कार्यपध्दतीनुसार सक्षम अधिकाऱ्यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतल्यानंतर विहीत मर्यादेत खर्च करण्यात यावे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा अनुदान वितरीत केले आहे म्हणून खर्च करु नये.</u>
७) नियमबाह्य योजना पदे आणि बाबींसाठी खर्च करु नये.

कृषि विद्यापीठाच्या नियंत्रक आणि इतर संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी उपरोक्त अटी व शर्तींचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

३.	याप्रित्यर्थ होणारा खर्च सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून मासिक निधी विवरणपत्राच्या मर्यादेत भागवावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४.	सहायक लेखाधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित उपशीर्षातर्गत मंजूर केलेले अनुदान कृषि विद्यापीठांचे संबंधित नियंत्रक यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५.	सदर आदेश महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५४७/२०२५/व्यय-१, दि.०४.०२.२०२६ देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०२२५१७२९२६९२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MITALI KALPESH CHAUDHARI

Digitally signed by MITALI KALPESH CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agricuture and Adf Deparment, 2.5.4.20=4367a98b1913c401683f04d0604dddbf6104bd9b26a678a0c12daf8bc922cfea, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=60ae0791d92611a135ce51a5ee439203fdbdb395146d132620b3437eded658ce, cn=MITALI KALPESH CHAUDHARI
Date: 2026.02.25 17:30:48 +05'30'

**( मिताली चौधरी )**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.
२) वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.
३) कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
४) कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
५) नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
६) सहायक लेखाधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
७) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी व उपकोषागार अधिकारी, दापोली, जि.रत्नागिरी.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
११) उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१२) उप सचिव, वित्त विभाग (व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१३) उप सचिव,कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१४) उप सचिव, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१५) कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.